# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २६.०२.२०२१**

**जिल्हा : सांगली**

| मागील आठवड्यातील हवामान (२०.०२.२०२१ ते २६.०२.२०२१) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२७.०२.२०२१ ते ०३.०३.२०२१) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | दिनांक | २७ | २८ | ०१ | ०२ | ०३ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| २७.२ | ३०.२ | ३१.२ | ३२.७ | ३४.२ | ३४.९ | - | कमाल तापमान (अं.से.) | ३७ | ३८ | ३७ | ३८ | ३८ |
| १६.४ | १९.४ | २०.३ | १८.९ | १८.९ | १९.७ | - | किमान तापमान (अं.से.) | २१ | २२ | २३ | २२ | २२ |
| ० | २ | २ | ० | ० | ० | - | ढग स्थिती (आकाश) | २ | ० | १ | २ | १ |
| ८० | ७७ | ८३ | ७९ | ७३ | ७१ | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ३९ | ३१ | २५ | ३२ | ४५ |
| ५५ | ४८ | ४८ | ५७ | ४५ | ७१ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | १७ | १२ | ११ | ११ | १२ |
| ३.७ | ३.७ | १.९ | १.९ | ०.० | ०.० | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ११ | १४ | १३ | ११ | १२ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | प. | ई. | पु.ई. | ई. | पु. |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश** | | प्रादेशिक हवामान संशोधन केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सांगली जिल्ह्यात दिनांक २७ फेब्रुवारी ते ०३ मार्च दरम्यान हवामान मुख्यत: स्वच्छ राहण्याची शक्यता आहे. कमाल तापमान ३७ ते ३८ अंश सेल्सिअस दरम्यान तर किमान तापमान ३७.० ३८.० अंश सेल्सिअस दरम्यान राहील. वाऱ्याचा वेग ताशी ११ ते १४ कि.मी. दरम्यान राहील. |
| **सामान्य सल्ला** | | ➢ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून " मेघदूत" अँड्रॉइड ॲप्लिकेशन तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट इ.च्या अंदाजासाठी "दामिनी" अँड्रॉइड ॲप्लिकेशन डाउनलोड करावे व त्याचा वापर करावा.<br>➢ फळबाग तसेच रब्बी पिकांना आवश्यकतेनुसार पाण्याची उपलब्धता करावी. |
| **संदेश** | | ➢ पक्व गहू, रब्बी ज्वारी व हरभरा पिकांची काढणी करून मळणी करावी व तयार शेतीमाल उन्हामध्ये वाळवून सुरक्षित ठिकाणी ठेवावा. |
| **गहू** | पक्वता | ➢ लवकर पक्व होणाऱ्या गहू पिकाची कापणी पिक पक्व होण्याच्या २-३ दिवस आधी करावी त्यामुळे गव्हाचे दाणे शेतात झडण्याचा प्रकार आढळत नाही. कापणीच्या वेळी दाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १५ % असावे. |
| **रब्बी ज्वारी** | पक्वता | ➢ पक्व झालेल्या ज्वारी पिकाची काढणी करावी. काढणी केलेली कणसे उन्हात वाळवावीत व नंतर मळणी करावी. साठवणुकी पूर्वी ज्वारीचे धान्य उन्हात वाळवावे व साठवणूक करावी. |
| **हरभरा** | पक्वता | ➢ हरभरा पिक ११० ते १२० दिवसांत तयार होते. घाटे कडक वाळल्यानंतर मगच हरभाऱ्याची काढणी करून मळणी करावी. यांनतर धन्यास ६ ते ७ दिवस कडक ऊन द्यावे व सुरक्षित ठिकाणी साठवून त्यामध्ये कडूनिंबाचा पाला (५%) घालावा त्यामुळे कीड लागत नाही. |
| **ऊस** | लागवड | ➢ ऊस खोडवा व्यवस्थापनाकरिता उस तोडणी झाल्यानंतर शेतात उरलेले उसाचे पाचट जाळू नये. किड, रोग व तणग्रस्त लागण क्षेत्र असल्यास खोडवा ठेऊ नये.<br>➢ सर्वसाधारणपणे १५ फेब्रुवारी पर्यंत तुटलेल्या ऊसाचाच खोडवा ठेवावा. त्यानंतर घेतलेल्या खोडवा ऊसावर खोड किडीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होतो.<br>➢ खोडवा उसामध्ये गवताळ वाढीची बेटे दिसून आल्यास त्वरित काढून नष्ट करावीत. |
| | पूर्वहंगामी | ➢ फेब्रुवारीमध्ये सरासरी बाष्पीभवनाचा वेग ५.४९ मी.मी. प्रती दिवस एवढा असतो त्यामुळे ऊस पिकास प्रती दिवस ३.२७लिटर पाण्याची गरज असते त्यासाठी ठिबक सिंचन संच (४लिटरचा ड्रीपर) दररोज ४९ मिनिटे चालू ठेवावा. |

## अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

| | | |
|---|---|---|
| **द्राक्ष** | वाढीची | ➢ द्राक्ष मणी वाढ होण्याच्या अवस्थेत असताना बागेस ठिबक सिंचन संचाच्या सहाय्याने प्रती एकर ६८०० ते १०२०० लिटर पाणी प्रती दिवस या प्रमाणे द्यावे.<br>➢ कोरड्या हवामानाची शक्यता असल्याने कोळी किडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे नियंत्रणासाठी सल्फर ८० डब्ल्यु.डी.जी.@१.५ ते २.० ग्रम प्रती लिटर किंवा आबामेक्टीन १.९ ई.सी.@०.७५ मिली प्रती लिटर पाणी याप्रमाणात फवारावे. |
| **डाळिंब** | वाढीची | ➢ मृग बहार :रस शोषक कीटकांचा प्रादुर्भाव जास्त आढळल्यास ल्यॅम्ब्डा सायहॅलोथ्रीन ५% ई.सी @ ०.५ ते ०.७५ मिली प्रती लिटर पाणी किंवा इंडोक्झाकार्ब १४.५% एस.सी. @ ०.७५ मिली प्रती लिटर पाणी किंवा थाईमेथोक्झाम २५ % डब्ल्यू. जी. @ ०.५ ग्रॅम प्रती लिटर पाणी याप्रमाणात कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी करावी. |
| | वाढीची | ➢ हस्त बहार: खवले कीड प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी सुरवातीच्या अवस्थेत असताना निम तेल १% + पोंगामिया तेल @३+३+ प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **कांदा** | वाढीची | ➢ कांद्यावरील फुलकिड्यांच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० % ई.सी. १५ मि.ली. किंवा ल्यॅम्ब्डा सायहॅलोथ्रीन ५ % ई.सी. ६ मि.ली. या कीटकनाशकांच्या प्रती १० लिटर पाण्यात मिसळून आलटून पालटून फवारण्या कराव्यात. |
| **हळद** | काढणी | ➢ हळद पिकाची काढणी जातीनुसार पिकाचा कालावधी पूर्ण झाल्यावर करावी. |
| **जनावरे** | वाढीची | ➢ जनावरांच्या चाऱ्यासाठी संकरीत नेपियर गवताची लागवड करावी त्यासाठी फुले जयवंत व फुले गुणवंत या वाणांचा वापर करावा. |

स्त्रोत
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

ठिकाण : कोल्हापूर
दि. :२६.०२.२०२१

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**
**सहयोगी संशोधन संचालक,**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**